# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४. Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.

**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539170.
**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. जे. डी. पाटील** — **Dr. J. D. Patil**
एम.डी. (होम) — M. D. (Hom.)
**संचालक - विद्यार्थी कल्याण** — **Director – Students' Welfare**

*All correspondence be addressed to the Registrar.*


मआविवि / एसडब्ल्यू / स्पंदन / ४४ /०९ दि. १६ /०१ /२००९

प्रति,
**मा. अधिष्ठाता / प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,

**विषय : विद्यापीठाचा सांस्कृतिक युवा महोत्सव "स्पंदन - २००९"**

महोदय / महोदया,

स्पंदन म्हणजे व्हायब्रेशन्स, स्पंदन म्हणजे पल्सेशन्स्, स्पंदन म्हणजे लय, ताल व गति यांचा त्रिवेणी संगम. अभ्यास, प्रात्यक्षिके व ओपीडीज यांच्या जाळयात अडकलेल्या भावी डॉक्टरांमध्ये दडलेल्या सुप्त कला गुणांचा अविष्कार म्हणजे स्पंदन. त्यामुळेच आपल्या सर्व भावी डॉक्टरांना स्पंदन मध्ये सहभागी झाल्यानंतर मिळालेली ऊर्जा, भविष्यकाळामध्ये त्यांच्याकडे वेदना घेऊन येणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्यासाठी खचितच वापरता येईल ही आशा. त्यामुळेच हा उपक्रम वर्षानुवर्षे असाच सुरु राहील व त्यासाठी आपले सर्वांचे सहकार्य सतत मिळत राहिल अशी खात्री आम्हाला वाटते.

मला आपणांस कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, विद्यापीठाचा यावर्षीचा राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव **"स्पंदन" फेब्रूवारी २००९ मध्ये नागपूर येथे** आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. स्पर्धाचा तपशिलवार कार्यक्रम आपणांस लवकरच कळविण्यात येईल. दरम्यान आपल्या महाविद्यालयातील स्पंदन मध्ये सहभागी होऊ ईच्छिणाऱ्या स्पर्धकांची प्रवेशिका सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात **दि. ३० जानेवारी २००९** पर्यत विद्यापीठात पाठवावी हि विनंती. आपल्या माहितीसाठी विद्यापीठात प्राप्त झालेल्या प्रवेशिका व नोंदणी फी पाठविणाऱ्या महाविद्यालयांची यादी सोबत जोडली आहे. सदर यादीमध्ये आपल्या महाविद्यालयाचे नाव असल्यास व नोंदणी फी अगोदरच पाठविली असल्यास नव्याने नोंदणी फी पाठविण्याची आवश्यकता नाही. **मात्र स्पर्धकांची नावे व कलाप्रकार याच्या माहितीसाठी सोबत जोडलेला नोंदणी अर्ज (नमुना अ) प्रत्येक महाविद्यालयाने भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.**

ज्या महाविद्यालयांनी प्रवेशिका व नोंदणी फी अजुनही पाठविलेली नाही त्यांनी आपल्या विहीत नमुन्यातील प्रवेशिकेसोबत **(नमुना अ) नोंदणी फी साठी रु. १०००/-** या रक्कमेचा नाशिक येथे देय असलेला डी. डी. **(स्पंदन २००९) (Spandan 2009)** या नावाने काढुन सोबत पाठवावा. प्रत्येक महाविद्यालयास संघव्यवस्थापक, स्पर्धक व संगीत साथीदारांसह कमाल **४० स्पर्धकांचा संघ** पाठविता येईल तसेच प्रत्येक संघासोबत **संघ व्यवस्थापक** पाठवणे व सोबतचा स्पर्धकांचा नोंदणी अर्ज (नमुना ब), सांघीक स्पर्धेसाठी (नमुना क) व संघ व्यवस्थापकाचा (नमुना ड) भरुण पाठवणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

स्पंदन साठी अपेक्षित खर्चाची तोंड मिळवणी करण्यासाठी स्मरणिका जाहीरातीच्या माध्यमातुन आपण गतवर्षी आम्हाला देणगी दिली होती. आपली जाहीरात असलेली आकर्षक अशी स्मरणीका आम्ही आपणांस अगोदरच पाठविली आहे. त्याच धर्तीवर याहीवर्षी देणगी जाहीरात देऊन उपकृत करावे, ही विनंती. जाहीरातीसाठीचे निवेदन सोबत जोडले आहे.

आपल्या अधिक माहितीसाठी स्पंदन – २००९ मध्ये सहभागी होण्यासाठी प्रवेशिका, विविध स्पर्धाची यादी, स्पर्धेची नियमावली तसेच महाविद्यालये व संघ व्यवस्थापकांसाठी महत्वाच्या सुचना सोबत जोडल्या आहेत त्यानुसार महाविद्यालयीन स्तरावर उचित कार्यवाही करुन आपली प्रवेशिका **दि. ३० जानेवारी २००९** पर्यत विद्यापीठास पाठवावी. यावर्षी महाविद्यालयीन संघ व स्पर्धानिहाय स्पर्धक संख्या मर्यादीत असल्यामुळे "प्रथम नोंदणी प्रथम प्राधान्य" **(First Come First Serve)** या नितीने मर्यादीत संघांना / स्पर्धकांना प्रवेश देण्यात येणार आहे त्यामुळे आपली प्रवेशिका लवकरात लवकर पाठवावी ही विनंती.

सदर परीपत्रक महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शीत करावे तसेच सर्व विद्यार्थी प्रतिनिधी व सर्व विद्यार्थी, सांस्कृतिक समन्वयक व संबंधीतांना अवगत करावे हि विनंती. सदर परीपत्रक व संपुर्ण सहपत्रे विद्यापीठाच्या www.muhsnashik.com या संकेतस्थळावर **स्पंदन २००९** या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. तद्नंतरही स्पंदन बाबत अधिक माहिती हवी असल्यास किंवा शंका असल्यास **श्री. दत्ता घुगे किंवा श्री. मनोज बोडके** यांच्याशी खालील दूरध्वनीवर संपर्क साधावा.


**कार्यालय : ०२५३ – २५३९ १७० / १७१ / १७२ / १७३**

**फॅक्स : ०२५३ – २५३९ १७१.**

**संकेत स्थळ : www.muhsnashik.com**

**e-mail : muhs.spandan@rediffmail.com**


स्पंदन – २००९ यशस्वी होण्यासाठी आपले सर्वतोपरी सहकार्य अपेक्षित आहे.

धन्यवाद !

आपला,

सही/-

**डॉ. जे.डी. पाटील**

**संचालक विद्यार्थी कल्याण**

**सोबत :** १. महाविद्यालयासाठी नियमावली व माहिती पत्रक.

२. स्पर्धेतील कलाप्रकार निहाय नियमावली.

३. महाविद्यालयाचा नोंदणी अर्ज – नमुना अ.

४. स्पर्धकांचा नोंदणी अर्ज – नमुना ब **(सर्व स्पर्धकांनी भरावयाचा आहे)**

५. सांघिक स्पर्धेचा नोंदणी अर्ज – नमुना क

६. संघ व्यवस्थापकांचा नोंदणी अर्ज – नमुना ड

७. महाविद्यालयाने जाहिरातीसाठी पाठवावयाचा नमुना – नमुना इ

- नमुना : ब -

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

## राज्यस्तरीय युवकमहोत्सव - स्पंदन २००९

स्पर्धकाचे प्राचार्यांनी साक्षांकित केलेले अलीकडच्या काळातले छायाचित्र

## " स्पर्धकांचा नोंदणी अर्ज "

**(प्रत्येक स्पर्धकाने विहीत नमुन्यातील हा अर्ज स्वतंत्रपणे भरावा)**

१. नाव : ____________________

२. पत्ता (घरचा) : ____________________

____________________

____________________

३. दूरध्वनी क्रमांक : ____________ मोबाईल : ____________

४. जन्म तारीख : ____________ वय : ____________

५. महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ____________________

____________________

____________________

६. कला प्रकार सहभाग : (जास्तीत-जास्त तीन वैयक्तीक व दोन सांघीक कला प्रकारात सहभाग घेता येईल)

१. वैयक्तिक : ____________________

२. वैयक्तिक : ____________________

३. वैयक्तिक : ____________________

४. सांघीक : ____________________

५. सांघीक : ____________________

७. मी या स्पर्धेत संपुर्णपणे स्वतःच्या जबाबदारीवर भाग घेत आहे. स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास, नुकसान झाल्यास मी आयोजकांना जबाबदार धरणार नाही. तसेच स्पर्धेच्या सर्व अटी व नियमांचे पालन करीन व पंचाच्या निर्णयाचा आदर करीन, असे लिहुन देतो.

८. स्पर्धक विद्यार्थ्यांची स्वाक्षरी :

---

## - प्रमाणपत्र -

प्रमाणित करण्यात येते की, स्पर्धक विद्यार्थ्याने नमूद केलेली माहिती महाविद्यालय / संस्था / पदवी-पद्व्युत्तर विभागाच्या कार्यालयीन दस्ताऐवजाप्रमाणे जुळली आहे.

**महाविद्यालय सांस्कृतिक समन्वयक / संघ व्यवस्थापक**

**अधिष्ठाता / प्राचार्य**

**महाविद्यालयाचा शिक्का**

- नमुना : क -

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

## राज्यस्तरीय युवकमहोत्सव - स्पंदन २००९

## " सांघीक स्पर्धेचा नोंदणी अर्ज "

(प्रत्येक सांघीक कलाप्रकारासाठी विहीत नमुन्यातील हा अर्ज स्वतंत्रपणे भरावा)

१. मुख्य कला प्रकार - ____________________

२. उप कला प्रकार - ____________________ (प्रत्येक सांघीक कला प्रकारासाठी स्वतंत्र अर्ज भरावा)

३. महाविद्यालयाचे नाव : ____________________

४. स्पर्धकांचा तपशिल :

| अ.क्र. | स्पर्धक विद्यार्थ्याचे नाव | शैक्षणिक वर्ग | जन्म तारीख | वय |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |

५. संगित साथीदारांची नावे :

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | जन्म तारीख | वय |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

महाविद्यालय सांस्कृतिक समन्वयक /
संघ व्यवस्थापक

अधिष्ठाता / प्राचार्य

महाविद्यालयाचा शिक्का

- नमुना : ड -

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

## राज्यस्तरीय युवकमहोत्सव - स्पंदन २००९

प्राचार्यांनी साक्षांकित केलेले अलीकडच्या काळातले छायाचित्र

## " संघ व्यवस्थापकांचा नोंदणी अर्ज "

**(प्रत्येक संघ व्यवस्थापकाने / महिला व्यवस्थापकाने विहीत नमुन्यातील हा अर्ज स्वतंत्रपणे भरावा)**

१. नाव : ____________________

२. पत्ता (घरचा) : ____________________

____________________

____________________

३. दूरध्वनी क्रमांक : ____________ मोबाईल : ____________

५. महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ____________________

____________________

____________________

६. संघ व्यवस्थापक / महिला व्यवस्थापक / शिक्षक यांचा कला प्रकार सहभाग :

१. ____________________

२. ____________________

७. मी या स्पर्धेत संपुर्णपणे स्वतःच्या जबाबदारीवर भाग घेत आहे. स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास, नुकसान झाल्यास मी आयोजकांना जबाबदार धरणार नाही. तसेच स्पर्धेच्या सर्व अटी व नियमांचे पालन करीन व पंचाच्या निर्णयाचा आदर करीन, असे लिहुन देतो.

८. संघ व्यवस्थापक / महिला व्यवस्थापक / शिक्षक यांची स्वाक्षरी :

**महाविद्यालयाचा शिक्का** **अधिष्ठाता / प्राचार्य**

**- नमुना : इ -**

# महाविद्यालयाने जाहिरातीसाठी पाठवावयाचा नमुना

**दि.    /    /२००९**

**प्रति,**
**मा. कार्याध्यक्ष स्पंदन - २००९**
**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,**
**म्हसरुळ वणी - दिंडोरी रोड,**
**नाशिक - ४२२ ००४**

**विषय : राज्यस्तरीय युवा महोत्सव स्पंदन - २००९ - स्मरणिका**

महोदय,

राज्यस्तरीय युवा महोत्सव स्पंदन - २००९ निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेत आमच्या महाविद्यालयाची रु................. ची जाहिरात प्रसिध्द करावी ही विनंती त्यासाठी रु............या रक्कमेचा धनादेश / धनाकर्ष क्र. ............दि.  /   /२००९ सोबत जोडून पाठवित आहे. सोबत जाहिरातीचा नमुना व जाहिरातीचे साहित्य जसे आर्टवर्क / पॉझिटिव्ह / प-लॉपी / सी.डी. पाठवित आहोत. कृपया जाहिरात / देणगीचा स्विकार करावा ही विनंती.

धन्यवाद,

आपला विश्वासू

शिक्का

(                                        )

**अध्यक्ष / सचिव / अधिष्ठाता / प्राचार्य**

सोबत :

कृपया **स्पंदन २००९** या नावाने काढलेला नाशिक येथे देय असलेला धनादेश / धनाकर्ष सोबत जोडला आहे.

**- जाहिरातीसाठी देणगी मूल्ये पुढीलप्रमाणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मलपृष्ठ कव्हर २ व ३ | रंगीत | रु. १,००,०००/- |
| ०२. | आर्ट पेपरवर (पुर्ण पान) | रंगीत | रु. ५०,०००/- |
| ०३. | आर्ट पेपरवर (अर्धे पान) | रंगीत | रु. ३०,०००/- |
| ०४. | शुभेच्छा देणगी (पाव पान) | —— | रु. १५,०००/- |

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## राज्यस्तरीय युवा महोत्सव - स्पंदन २००९
## महाविद्यालयासाठी नियमावली व माहिती पत्रक

---

**अ. महाविद्यालय व संघ व्यवस्थापकांना महत्वाच्या सुचना :**

१) प्रत्येक महाविद्यालयाच्या संघासोबत मान्यताप्राप्त प्राध्यापक संघ व्यवस्थापक म्हणून असणे आवश्यक आहे. संघ फक्त विद्यार्थीनींचाच असल्यास स्वतंत्र महिला संघ व्यवस्थापक असणे आवश्यक आहे.

२) एका स्पर्धकास जास्तीत-जास्त तीन वैयक्तीक व दोन सांघीक अशा पाच कला प्रकारात सहभागी होता येईल. जास्तीचा सहभाग आढळून आल्यास त्याचा सहभाग रद्द करण्यात येईल.

३) सर्व संघ व्यवस्थापकांनी स्पर्धेच्या कालावधीत संघासोबत निवासी थांबणे सक्तीचे आहे व त्यांनी आपआपल्या विद्यार्थ्यासोबत स्पंदन साठीच्या परिसरात थांबणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. संघ व्यवस्थापकांनी स्पर्धकास, नातेवाईक अथवा मित्र यांच्याकडे जाण्यास परवानगी देवु नये.

४) प्रत्येक संघ व्यवस्थापकाने सोबत जोडलेले विहित नमुन्यातील सर्व अर्ज संपुर्ण भरणे आवश्यक आहे. नोंदणी अर्ज (नमुना अ) संपुर्ण भरुण प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावापुढे स्पर्धेच्या संबंधीत रकान्यात (✔) बरोबरची खुण करावी. स्पर्धकांचा नोंदणी अर्ज (नमुना ब) प्रत्येक विद्यार्थ्याने सुवाच्य हस्ताक्षरात स्वतंत्रपणे भरावा तसेच सांघीक स्पर्धेसाठी सहभागी संघांनी (नमुना क) भरणे तसेच प्रत्येक संघ व्यवस्थापकाने स्वतःसाठी (नमुना ड) भरणे आवश्यक आहे. **(शिक्षकांसाठीच्या स्पर्धेत सहभाग नसला तरी)**

५) नोंदणीच्या वेळी, विद्यार्थ्यांच्या निवाससाठी आवश्यक साहित्य, संघ व्यवस्थापकांच्या ताब्यात देण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाकडुन **रु.५००/-** अनामत घेतले जातील व रितसर पावती देण्यात येईल. जातेवेळी साहित्य परत केल्यावर अनामत रक्कम परत केली जाईल. अपुर्ण साहित्याचे पैसे कापले जातील याची नोंद घ्यावी.

६) स्पंदन २००९ च्या प्रथम दिवशी संघ व्यवस्थापकांची सभा घेण्यात येईल. सभेस सर्व संघ व्यवस्थापकांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

७) संघ व्यवस्थापकांच्या सभेत वक्तृत्व, वादविवाद व चित्र स्पर्धेचा विषय जाहिर केला जाईल.

८) आयोजकांव्दारे कला प्रकारानुसार सादरीकरणाचा क्रम ठरविला जाईल. नोंदणीच्या वेळी तो जाहिर केला जाईल व त्याचप्रमाणे सादरीकरण होईल

९) कोणत्याही कला प्रकारासाठी लागणारी वाद्ये व इतर साहित्य स्पर्धकाने स्वतःचे आणावयाचे आहे.

१०) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल व तो सर्वांवर बंधनकारक राहिल. संघ व्यवस्थापकांनी कोणत्याही कारणाने परिक्षकांना भेटु नये. परीक्षकांवर कुठल्याही प्रकारचा दबाव आणल्यास स्पर्धकास स्पर्धेतुन बाद करण्यात येईल.

११) संघ व्यवस्थापकांनी आपल्या महाविद्यालयाचे काही लेटरहेड सोबत ठेवावे. कोणतीही तक्रार लेटरहेड शिवाय व संघ व्यवस्थापकाच्या सही शिवाय स्वीकारली जाणार नाही. अशी तक्रार संचालक / समन्वयक यांच्याकडे दयावी.

१२) सामूहिक कला प्रकारात संघ मुलांचा अथवा मुलींचा अथवा मुलामुलींचा मिश्र असला तरी चालेल.

१३) कोणत्याही स्पर्धकाचे वय स्पर्धेच्यावेळी **<u>२५ वर्षापेक्षा</u>** जास्त असणार नाही याची काळजी प्रत्येक महाविद्यालयाने घ्यावी. **(जन्म ३१ / ११ / १९८४ पुर्वीचा नसावा)**

१४) महाविद्यालय संघाचा प्रवास व दैनंदिन खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे याची नोंद घ्यावी.

१५) स्पंदन २००९ संबंधी कोणताही निर्णय घेण्याचा, कार्यक्रमात बदल करण्याचा तसेच एखादी स्पर्धा रद्द करण्याचा अधिकार आयोजन समितीने राखून ठेवला आहे.

**ब. स्पर्धक विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचना :**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने **"स्पंदनच्या"** नियमांचे, संघ व्यवस्थापकांच्या सुचनांचे पालन करावे. निवासस्थानी, स्पर्धा परिसरात व प्रत्यक्ष स्पर्धेच्या वेळी शांतता ठेवावी.

२) प्रत्येक स्पर्धकांने महाविद्यालयाचे ओळखपत्र आपल्या सोबत ठेवावे. तसेच स्पर्धेचे ओळखपत्रक शरीराच्या दर्शनी भागावर दिसेल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

३) कोणत्याही स्पर्धकाने तक्रारीसाठी संचालक – विद्यार्थी कल्याण किंवा आयोजन समिती सदस्यांना परस्पर भेटू नये. तक्रार असल्यास लेखी स्वरुपात संघ व्यवस्थापकांमार्फत पाठवावी.

४) विद्यार्थ्यांनी रात्री १०.०० नंतर विद्यार्थीनीं सोबत थांबू नये, विद्यार्थीनींच्या निवासाकडे कोणत्याही कारणाने जाऊ नये. हाच नियम विद्यार्थीनीसाठीही लागू असेल.

५) स्पर्धकांनी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत करावी. सदर परिसरात आपणच राहणार आहोत.

६) वरील नियमभंग करणाऱ्या विद्यार्थ्यावर कडक कारवाई करण्यात येईल / संघ बाद करण्यात येईल. त्याचा परिणाम संघाच्या एकूण कामगिरीवर होईल, याची नोंद घ्यावी.

**क. सांस्कृतिक पथसंचलन ( CULTURAL MARCH ) :**

१) प्रत्येक महाविद्यालयाचा एक संघ सहभागी असेल.

२) प्रत्येक संघाला **स्त्री भ्रूण हत्या (बेटी बचाओ अभियान)** या ज्वलंत प्रश्नावर आधारीत देखावा / पथनाटय / सादरीकरण सादर करता येईल.

३) पथसंचलनात / सादरीकरणात सर्व कलावंत व संघव्यवस्थापक यांचा सहभाग अपेक्षीत आहे.

४) प्रत्येक संघाने आपल्या महाविद्यालयाचा ध्वज, नावाचे बॅनर संघाच्या प्रारंभी लावणे आवश्यक आहे.

५) सादरीकरणाचा दर्जा, एकसंघपणा, एकरुपता व मध्यवर्ती कल्पना यानुसार गुण दिले जातील.

**ड. फॅशन – शो ( Fashior Show ) :**

सदर स्पर्धा विद्यापीठ पातळीवरील स्वतंत्र स्पर्धा असुन या स्पर्धेतील विजेते / उपविजेते / गुणदान यांचा विचार सर्वसाधारण विजेते / उपविजेते पद ठरवितांना केला जाणार नाही. या स्पर्धेमध्ये पारंपारीक फॅशन – शो प्रमाणे केवळ सुंदरता व वेशभुषा यांचाच विचार न करता स्पर्धकाची बुध्दिमत्ता / हजरजबाबीपणा याचाही विचार केला जाईल.

१) एका महाविद्यालयाच्या एक विद्यार्थी व एका विद्यार्थीनीस सहभाग घेता येईल. (कमाल दोन)

२) या स्पर्धेसाठी दोन फेऱ्या असतील. पहिल्या फेरीत भारतीय पारंपारिक वेशभुषा परिधान करुन सभागृहात स्वपरिचय (Introduction) करुन द्यावयाचा आहे. सोबतच मा. परिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावयाची आहेत.

३) पहिल्या फेरीत पाच परिक्षकांनी दिलेल्या गुणांच्या सरासरीवर काही स्पर्धकांना दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

४) दुसरी फेरी विशेष परीक्षक फेरी असेल. या फेरीमध्ये स्पर्धक परीक्षकाच्या नावाची चिठ्ठी उचलतील ते परीक्षक त्या स्पर्धकास एक विशेष प्रश्न व आवश्यकता असल्यास उपप्रश्न विचारतील.

५) पहिल्या फेरीतील एकुण गुण व दुसऱ्या फेरीतील गुण यांच्या संयुक्त गुणसंख्येनुसार विजेतेपद / उपविजेतेपद ठरविले जाईल.

६) विद्यार्थी व विद्यार्थीनीचे स्वतंत्र विजेते ठरविण्यात येतील.

**<u>इ. संघ व्यवस्थापक व शिक्षकांसाठी स्पर्धा (Compition For Team Manager / Teacher):</u>**

**१) सुगम गायन ( Light Vocal Song ) :**

१) एका महाविद्यालयाच्या जास्तीत जास्त एका संघव्यवस्थापक / शिक्षकास सहभागी होता येईल.

२) संगीत साहित्य लावणे, सुर जुळवणे इ. पुर्वतयारीसाठी ५ मिनिटे व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे असतील व सदर वेळ अंतीम उदघोषणा झाल्यापासुन लगेचच मोजण्यात येईल.

३) या कला प्रकारात एकुण दोन गिते सादर करावयाची आहेत. पहिल्यांदा इंग्रजी वगळता इतर भारतीय भाषांतील भक्तीगीत, भजन, किंवा अभंग, सादर करता येईल व तद्नंतर गझल, पोवाडा, भावगीत, देशभक्तीपर किंवा पारंपारीक गीत सादर करता येईल.

४) या स्पर्धेसाठी फक्त संगीताची रेकॉर्डेड कॅसेट / कॅरॉओके कॅसेट वापरता येईल.

५) सुर, ताल, सादरीकरण, गुणवत्ता व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण देण्यात येईल.

**२) कल्पक सादरीकरण (Creative Presentation) :**

१) एका महाविद्यालयाच्या एका शिक्षकास / संघ व्यवस्थपकास सहभागी होता येईल.

२) रंगमंचावर येणे, साहित्य लावणे, सुर जुळविणे इ. पूर्वतयारीसाठी ५ मिनीटे व सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिली जातील.

३) या स्पर्धेत स्पर्धकाला सुगम गीत गायन सोडून काहीही कला सादर करता येईल जसे मिमीक्री, नाटयप्रवेश, विडंबन, एकपात्री प्रवेश, स्वरचित काव्य गायन इत्यादी.

४) अभिनय, कल्पकता, सादरीकरण व सर्वसाधारण परीणाम यांचा विचार करुन गुणदान केले जाईल.

**<u>फ. सर्वसाधारण विजेतेपद :</u>** स्पंदन २००९ या युवक महोत्सवात सहभागी होणाऱ्या राज्यातील सर्व महाविद्यालयामधून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे व सर्व साधारण विजेते / उपविजेते पद म्हणून चषक, प्रमाणपत्र, पदक देण्यात येईल. त्यादृष्टीने काही निकष खालील प्रमाणे असतील.

१) महाविद्यालयाचा जास्तीत-जास्त कला प्रकारात सहभाग असणे आवश्यक असेल.

२) महाविद्यालयाचा संघ सांस्कृतीक संचलनात सहभागी असणे बंधनकारक आहे व त्याचा विचार विजेतेपदासाठी करण्यात येईल.

३) महाविद्यालयाच्या संघाने व व्यवस्थापकाने शिस्तीचे, वेळेचे व नियमांचे पालन केलेले असावे

४) महाविद्यालयाच्या संघाने जास्तीत-जास्त पारितोषिके प्राप्त केलेली असावी.

५) प्रत्येक संघाची स्पर्धेच्या ३ दिवसाच्या कालावधीतील एकुण वागणुक, व्यवहार, शिस्त पालन व संघाचे टिम स्पिरीट इत्यादी गोष्टींचाही विजेतेपद देतांना विचार केला जाईल.

६) सर्वसाधारण विजेतेपदासाठी गुण विभागणी AIU तक्त्यानुसार गुण दिले जातील.

७) एखादया स्पर्धेसाठी पुरेसे स्पर्धक नसल्यास सदर स्पर्धा रद्द करण्याचे तसेच सर्व साधारण नियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार संयोजकांकडे असतील.

८) फॅशन-शो व संघ व्यवस्थापक / शिक्षक यांच्यासाठी असलेल्या स्पर्धामधील विजेतेपद / उपविजेतेपद / गुणदान यांचा विचार सर्वसाधारण विजेते / उपविजेते ठरवितांना केला जाणार नाही.

**<u>ग. विद्यापीठ संघ निवड प्रक्रिया :</u>** आपल्या विद्यापीठाचा संघ हा विविध युवा महोत्सवात पाठविला जातो. विविध कलागुण असलेल्या गूणवान कलावंतांची निवड "स्पंदन" युवा महोत्सवातून करण्यात येणार असून त्यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाने निवड समिती गठित केली असून सदर समिती सदस्य "स्पंदन" परिसरात फिरुन, कलाप्रकारात प्रेक्षक म्हणुन, प्रत्यक्ष कलाकाराशी भेटून चर्चा करुन संघ निवडीसाठी शिफारस करणार आहेत. सदर निवड करतांना "स्पंदन" मधील पारितोषिक एवढाच निकष नसेल तर विद्यार्थ्यांचे कलागुण, स्पर्धास्थळी वर्तणुक, शिस्त पालन व खिलाडु वृत्ती हा निकष असेल.

Cancellater of One Act Play